प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २० मार्च २०२५**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांकरिता पुनर्वसन व पुन:स्थापना तसेच २२.५% योजनेंतर्गत १३ भूखंडांची संगणकीय सोडत संपन्न**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांकरिता पुनर्वसन व पुन:स्थापना योजने अंतर्गत १२ आणि २२.५% योजने अंतर्गत १ याप्रमाणे एकूण १३ भूखंडांची संगणकीय सोडत गुरुवार, दि. २० मार्च २०२५ रोजी सिडको भवन येथे यशस्वीरीत्या पार पडली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तद्अनुषंगिक कामांकरिता संपादित करण्यात आलेल्या जमिनी व बांधकामाच्या मोबदल्यापोटी प्रकल्पबाधितांना पुनर्वसन व पुन:स्थापना आणि २२.५% योजने अंतर्गत १३ भूखंडांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, श्री. नवनाथ जरे, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (न.मुं.आं.वि.), श्रीमती. गीता पिल्लई, महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) आणि अन्य संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या सोडतीकरिता मौजे-चिंचपाडा विठ्ठलवाडी येथील २० मीटर पट्ट्यासाठी संपादित करण्यात आलेल्या बांधकामांकरिता ३, राष्ट्रीय महामार्ग ४ बी आम्रमार्ग अंतर्गत संपादित करण्यात आलेल्या बांधकामांकरिता ८ तसेच ७० मीटर आम्रमार्गासाठी संपादित केलेल्या बांधकामाकरिता १ आणि २२.५% योजने अंतर्गत पूर्वी वाटप केलेली पात्रता रद्द करून एकत्रित पात्रतेकरिता १ आणि २२.५% योजनेंतर्गत पूर्वी वाटप केलेली पात्रता रद्द करून एकत्रित पात्रतेकरिता १ या प्रमाणे एकूण १३ बांधकामधारक/भूखंडधारक पात्र ठरले आहेत. या भूखंडधारकांना सदर सोडतीद्वारे भूखंडांचे वाटप करण्यात आले.

सिडकोतर्फे रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामध्ये ११६० हेक्टरवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. विमानतळ प्रकल्पबाधितांना महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेले देशातील सर्वोत्तम पुनर्वसन पॅकेज सिडकोकडून देण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**